(महाराष्ट्र शासनाने वर्षे १९८९ मध्ये स्थापिलेले)
(Established by Government of Maharashtra in the year 1989)

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

***Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik***

ज्ञानगंगा घरोघरी

## व्यवस्थापन मंडळ बैठक

**Meeting of the Board of Management**

## कार्यवृत्त

**Mminutes of Meeting**

**बैठक क्रमांक** (Meeting Number) : 188

**स्थळ** : व्यवस्थापन मंडळ सभागृह,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,
नाशिक ४२२२२२

**Venue** : Board of Management Meeting Hall
Yashwantrao Chavan Maharashtra Open, University,
Nashik, 422 222

**वार व दिनांक (Day and Date )** : मंगळवार, दिनांक 20 जून 2023
Tuesday, 20th June 2023

**वेळ** (Time) : सकाळी ११.३० वाजता (11.30 a.m.)

मा. कुलगुरु कार्यालय
य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक
अंतर्गत आवक क्र.: VC/2641
दि. 27/ 6 /2023

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

(महाराष्ट्र शासनाने वर्षे 1989 मध्ये स्थापिलेले)

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळाची बैठक क्र.188 मंगळवार दिनांक 20 जून 2023 रोजी सकाळी 11.30 वाजता विद्यापीठ मुख्यालयातील सभागृह, नाशिक येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 01.प्रा. संजीव सोनवणे, कुलगुरू | | अध्यक्ष |
| 02 डॉ. सत्यकामा, प्र कुलगुरू, इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ, नवी दिल्ली | | सदस्य |
| 03 डॉ.अनिल कुलकर्णी,पुणे | | सदस्य |
| 04. डॉ.संजय चोरडिया, पुणे | (Online) | सदस्य |
| 05. डॉ.जयदीप निकम, संचालक, निरंतर शिक्षण विद्याशाखा | | सदस्य |
| 06. श्री. भटूप्रसादपाटील, कुलसचिव | | सचिव |
| 07. डॉ. गोविंदकतलाकुटे, वित्त अधिकारी | | निमंत्रित सदस्य |

**खालील सदस्यांची अनुपस्थिती मान्य करण्यात आली.**

| | |
|---|---|
| 08. सचिव, उच्च व तंत्रशिक्षण, मुंबई | सदस्य |
| 09. सचिव, उद्योग, मुंबई | सदस्य |
| 10. सचिव, कृषी विभाग, मुंबई | सदस्य |
| 11. संचालक, उच्च शिक्षण, पुणे | सदस्य |
| 12. संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई | सदस्य |
| 13. संचालक, व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण मुंबई | सदस्य |
| 14. प्रा.डी. टी. शिर्के, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | सदस्य |
| 15. आमदार श्री. सुहास कांदे, नाशिक | सदस्य |
| 16. आमदार श्रीमती सरोज आहिरे,नाशिक | सदस्य |
| 17. श्री.उदित सेठ, मुंबई | सदस्य |

| विषय क्र. | उपविषय ठराव क्र | तपशील |
|---|---|---|
| 188.1 | | स्वागत - नवनियुक्त कुलगुरू मा. प्रा. संजीव सोनवणे यांचे सर्व सन्माननीय सदस्यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. |
| 188.2 | 188.2.1 | दिनांक 30 मार्च 2023 रोजी झालेल्या 187 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करणे.<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - दिनांक 30 मार्च 2023 रोजी झालेल्या 187 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले. |
| | 188.2.2 | दिनांक 30 मार्च 2023 रोजी झालेल्या 187 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीतील झालेल्या निर्णयावरील कार्यवाहीचा अहवाल<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव - दिनांक ३० मार्च २०२३ रोजी झालेल्या १८७ व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीतील झालेल्या निर्णयावरील कार्यवाहीच्या अहवालाची नोंद घेण्यात आली.** |
| | | **सखोल चर्चेचे विषय** |
| 188.3 | 188.3.1 | **अंतर्गत गुणवत्ता आश्वासन केंद्राचा सन 2019-20, 2020-21, 2021-22 चा वार्षिक अहवाल कार्योत्तर मंजूरीस्तव व्यवस्थापन मंडळासमोर सादर....**<br>**टिपणी** - DEB-UGC कार्यालयात ऑनलाईन पद्धतीने अंतर्गत गुणवत्ता आश्वासन केंद्राचा सन 2019-20, 2020-21, 2021-22 चा वार्षिक अहवाल कार्योत्तर मंजूरीस्तव व्यवस्थापन मंडळासमोर सादर....<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - **अंतर्गत गुणवत्ता आश्वासन केंद्राचा सन 2019-20, 2020-21, 2021-22 चा वार्षिक अहवालास कार्योत्तर मान्यता सर्वानुमते देण्यात आली.** |

| | | |
|---|---|---|
| | 188.3.2 | **विद्यापीठातील दृकश्राव्य केंद्रातील तांत्रिक संवर्गातील गट – अ च्या पदोन्नतीचा प्रस्ताव व्यवस्थापन मंडळासमोर सादर...**<br>**टिपणी** - विद्यापीठातील दृकश्राव्य केंद्रातील नियमित कर्मचाऱ्यांना पदोन्नती देणेकरिता खातेतंर्गत पदोन्नती समितीची बैठक दि. 30.05.2023 रोजी आयोजित करण्यात आली होती. या समितीने गट – अ या संवर्गातील Maintenance Engineer, Video Engineer, Video Editor, Audio Engineer and Producer या 5 पदांच्या खातेतंर्गत पदोन्नतीबाबत केलेल्या शिफारशी मा. व्यवस्थापन मंडळापुढे मान्यतेस्तव सादर...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव - दि. 30.05.2023 रोजी आयोजित दृकश्राव्य केंद्रातील नियमित कर्मचाऱ्यांना पदोन्नती देणेकरिता खातेतंर्गत पदोन्नती समितीने गट – अ या संवर्गातील (Maintenance Engineer, Video Engineer, Video Editor, Audio Engineer and Producer) या 5 पदांच्या खातेतंर्गत पदोन्नतीबाबत केलेल्या शिफारशींना सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |
| | 188.3.3 | **विद्यापीठातील शिक्षकांचा सातव्या वेतन आयोगानुसार तयार करण्यात आलेल्या CAS – API form ला मान्यता मिळणेबाबत...**<br>**टिपणी** –सातव्या वेतन आयोगाच्या शासन निर्णयानुसार शिक्षकांना करिअर ॲडव्हान्समेंट योजनेअंतर्गत वरिष्ठश्रेणी ते प्राध्यापकपदी पदोन्नती पर्यंतचे लाभ देण्याकरिता IQSC समितीपुढे API Form हा युजीसी/आयसीएआर आणि AICTE च्या निकषानुसार भरून आवश्यक कागदपत्रांसह सादर करवयाचा असतो. सदर CAS – API form हा ज्या-त्या Appex Body चे निकष व राष्ट्रीय शैक्षणिक धोरण च्या विचारानुसार तयार करावयाचा असतो. वरील निकषानुसार विद्यापीठातील शिक्षकांसाठी, ग्रंथपालांसाठी व अभियांत्रिकी व तंत्रज्ञान शाखेसाठी AICTE च्या निकषानुसार तयार करण्यात आलेला CAS – API form व्यवस्थापन मंडळापुढे मान्यतेस्तव सादर...<br>**<u>व्यवस्थापन मंडळ ठराव</u> - विद्यापीठातील शिक्षकांसाठी, ग्रंथपालांसाठी व अभियांत्रिकी व तंत्रज्ञान शाखेसाठी AICTE च्या निकषानुसार तयार करण्यात आलेला CAS – API form ला सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |
| | 188.3.4 | **विद्यापीठातील प्राध्यापक तसेच शैक्षणिक संवर्गातील रिक्त पदे भरणेबाबत जाहीरात प्रसिद्ध करण्यास मान्यता मिळणेबाबत...**<br>**टिपणी** – दि. 1.10.2021 रोजी प्राध्यापक पदाची जाहीरात प्रसिद्ध करण्यात आली होती. सदर जाहीराती नुसार चार पदांकरिता एकूण 86 अर्ज प्राप्त झाले होते त्यापैकी 23 उमेदवार पात्र झालेले होते. त्यावेळी विद्यापीठाची कुलगुरू निवड प्रक्रिया सुरू असल्याने पात्र उमेदवारांच्या मुलाखती आयोजित करावयाच्या बाकी होत्या.<br>यादरम्यान शासनाच्या शा.नि. दि. 11 एप्रिल 2022 अन्वये शैक्षणिक पदांचे विषयनिहाय आरक्षणाऐवजी संवर्गनिहाय आरक्षणानुसार पदे भरण्याचे निर्देशित केलेले असल्याने विषयनिहाय ऐवजी संवर्गनिहाय आरक्षण लागू झाल्याने<br>1. यापूर्वीची प्राध्यापक पदाची जाहिरातप्रक्रिया रद्द करून नव्याने जाहीरात प्रसिद्ध करण्यास व्यवस्थापन मंडळापुढे मान्यतेस्तव सादर<br>2. निवडसमितीत विषय तज्ञांचे तसेच सदस्यांचे नामनिर्देशन करणेबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन मंडळापुढे मान्यतेस्तव सादर....<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव - दि. 1.10.2021 रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली प्राध्यापक पदाची जाहिरातप्रक्रिया रद्द करून नव्याने जाहीरात प्रसिद्ध करण्यास व निवडसमितीत विषय तज्ञांचे तसेच सदस्यांचे नामनिर्देशन करण्याचे अधिकार मा. कुलगुरू यांना देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |

| | | |
|---|---|---|
| | 188.3.5 | **विद्यापीठाच्या कुलसचिव पदाची जाहीरात प्रसिद्ध करण्यास मान्यता मिळणेबाबत....**<br>**टिपणी** – विद्यापीठाचे कुलसचिव पद भरणेबाबत दि. 3 जून 2022 रोजी जाहीरात प्रसिद्ध करण्यात आलेली होती. सदर जाहीरातीन्वये कुलसचिव पदांकरिता एकूण 32 अर्ज प्राप्त झालेले होते त्यापैकी छाननीअंती 20 उमेदवार पात्र झालेले होते. त्यावेळी विद्यापीठाची कुलगुरू निवड प्रक्रिया सुरू असल्याने पात्र उमेदवारांच्या मुलाखती आयोजित करावयाच्या बाकी होत्या. सदर जाहीरात देऊन जवळपास वर्षाचा कालावधी झालेला असल्याने<br>1. कुलसचिव पदाची नव्याने जाहीरात प्रसिद्ध करण्यास<br>2. कुलसचिव पदाच्या निवड समितीत दोन व्यवस्थापन मंडळ सदस्यांचे नामनिर्देशन करणेबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन मंडळापुढे मान्यतेस्तव सादर.....<br>**<u>व्यवस्थापन मंडळ ठराव</u> - दि. 3 जून 2022 रोजी कुलसचिव पदाच्या प्रसिद्ध केलेल्या जाहीरातीतील प्राप्त झालेले अर्ज गृहीत धरून कुलसचिव पदाची नव्याने जाहीरात प्रसिद्ध करण्यास व या पदाच्या निवड समितीत दोन व्यवस्थापन मंडळ सदस्यांचे नामनिर्देशन करण्याचे अधिकार मा. कुलगुरू यांना देण्यात आले.** |
| | 188.3.6 | **नियोजन मंडळावर सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे (Joint Director, Technical & Vocational Education, Pune) यांच्या नामनिर्देशनाबाबत...**<br>[**टिपणी** : नियोजन मंडळावर विद्यापीठ परिनियम क्रमांक 3(1/1992) मधील sub-section(2) of section 18 of the Act च्या 3(iv) अन्वये तीन सदस्यांची नेमणूक व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेने करावयाची असते. तीन पैकी 2 सदस्यांची नेमणूक झालेली आहे. एका रिक्त जागेसाठी Technical and Vocational Education मधून डॉ. डी. आर. नंदनवार यांची 13 एप्रिल 2023 पासून तीन वर्षाच्या कालावधीकरिता नेमणूक केली होती ते दि. 30 जून 2023 रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत असल्याचे त्यांच्या कार्यालयाने दि. 8 मे 2023 रोजी कळविले असल्याने डॉ. दत्तात्रय व्यं. जाधव सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांचे नियोजन मंडळावर नामनिर्देशन करण्याचा प्रस्ताव व्यवस्थापन मंडळासमोर सादर......]<br>**<u>व्यवस्थापन मंडळ ठराव</u> - नियोजन मंडळावर विद्यापीठ परिनियम क्रमांक 3(1/1992) मधील sub-section(2) of section 18 of the Act च्या 3(iv) अन्वये डॉ. दत्तात्रय व्यं. जाधव सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांच्या नामनिर्देशनास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |
| | 188.3.7 | **श्री. दादाजी नानाजी गांगुर्डे, करारावरील कार्यकारी अभियंता (स्थापत्य), बांधकाम व देखभाल कक्ष यांना कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांचे सर्व अधिकार व जबाबदाऱ्या प्रदान करण्यास मान्यता मिळणेबाबत....**<br>[ **टिपणी** – विद्यापीठाचे कार्यकारी अभियंता (सातव्या वेतन आयोगानुसार वेतनस्तर एस-23) हे नियमित पद निवृत्ती मुळे रिक्त आहे. विद्यापीठ प्रांगण व विभागीय केंद्रावरील इमारतींच्या देखभालीसाठी करारावरील कार्यकारी अभियंता (स्थापत्य) हे पद व विद्यापीठ परिनियम क्र. 11( 2 of 1993) नुसार निवड समितीचे गठण करण्यात आले होते. त्यानुसार आलेल्या 9 अर्जाबाबत दि. 07.06.2023 रोजी मुलाखत आयोजित करण्यात आली होती. त्यातून निवड समितीने श्री. दादाजी नानाजी गांगुर्डे यांची या पदासाठी शिफारस केली असून त्यांना कार्यकारी अभियंता पदाचे सर्व अधिकार व जबाबदाऱ्या प्रदान करण्याचा विषय मा. व्यवस्थापन मंडळापुढे मान्यतेसाठी सादर...<br>**<u>व्यवस्थापन मंडळ ठराव</u> - श्री. दादाजी नानाजी गांगुर्डे, करारावरील कार्यकारी अभियंता (स्थापत्य), बांधकाम व देखभाल कक्ष यांना कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांचे सर्व अधिकार व जबाबदाऱ्या प्रदान करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |

| | | |
|---|---|---|
| | 188.3.8 | **विद्यापीठातील सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी यांना करारावर नियुक्त करणेबाबतचा विषय मा. व्यवस्थापन मंडळापुढे मान्यतेसाठी सादर...**<br><br>[ **टिपणी** – विद्यापीठातील 341 पैकी 2023 अखेर 108 शिक्षक व शिक्षकेतर अधिकारी व कर्मचारी सेवा निवृत्त झाल्याने सध्या 182 शिक्षक व शिक्षकेतर अधिकारी व कर्मचारी सेवेत कार्यरत आहेत. नविन भरती प्रक्रिया न राबविल्याने विद्यापीठातील सगळ्याच विभागांमध्ये अपुरे कर्मचारी/मनुष्यबळ असल्याने कार्यरत कर्मचाऱ्यांवर अधिकच्या कामाचा ताण येतो आहे. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांमुळे विद्यापीठातील विभागांमध्ये कामाचा ताण वाढल्यामुळे संबंधित विभागांनी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना पुन्हा सेवेत घेण्याबाबत मागणी केलेली आहे.<br><br>1. महाराष्ट्र शासनाच्या दि. 17 डिसेंबर 2016 च्या शासन निर्णयानुसार सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पद्धतीने खालील प्रमाणे घेता येतील-<br><br>• विवक्षित व सेवा / कामांसाठी विषयनिहाय एमपॅनलमेंट करून गट-अ आणि गट-ब मधील सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पद्धतीने उपलब्ध करून घेता येतील.<br>• करार पद्धतीची नियुक्ती एका वेळी जास्तीत जास्त एक वर्षासाठी देण्यात यावी. परंतु नियुक्तीच्या आवश्यकतेनुसार वाढीव कालावधीकरिता दरवर्षी नुतनीकरण करता येईल. मात्र एकूण कालावधी 3 वर्षापेक्षा जास्त असणार नाही.<br>• सदर नियुक्तीवेतन धारकांना सदर शासन निर्णयातील परिशिष्ट - अ नुसार वेतन देय राहील.<br>• करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्ती वयाच्या 65 व्या वर्षापर्यंतच कार्यरत राहू शकतील. तथापि, ज्या व्यक्तींच्या सेवा त्यानंतर चालू ठेवणे आवश्यक आहे असे मत असले तर त्यांच्या सेवा सक्षम प्राधिकाऱ्यास एक स्तर वरिष्ठ अधिकाऱ्याच्या / प्रधिकाऱ्याच्या मान्यतेने पुढे चालू ठेवता येतील. मात्र करार पद्धतीने नियुक्त केलेल्या व्यक्ती वयाच्या 70 वर्षापर्यंतच कार्यरत राहू शकतील.<br><br>2. विद्यापीठामध्ये गट अ व गट ब बरोबरच गट क मधील कर्मचारीही सेवानिवृत्त होत आहे. त्यामुळे गट अ व गट ब प्रमाणेच गट क मधील कर्मचाऱ्यांची संख्याही कमी होत आहे. विद्यापीठातील कामांची निकड व अपुरे मनुष्यबळ पाहता गट क वर्गातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनाची नियुक्त करण्याची आवश्यकता वाटते. गट क मधील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या सेवा - करार पद्धतीने मुद्दा क्र. 3) मधील i), ii), iii), iv) प्रमाणे घेता येऊ शकतील.<br><br>3.करारावरील पदांच्या नेमणूका ह्या खालील परिनियम व कायदा नुसार करता येतात.<br>a) **विद्यापीठ कायदा क्र. 20 (9 सी) अन्वये** मा. कुलगुरूंना कमीत कमी सहा महिने आणि जास्तीत जास्त एक वर्षापर्यंत नियुक्त्यांचे अधिकार आहेत.<br>b) **विद्यापीठ परिनियम क्र.** 11 (2 of 1993) **अन्वये** एकूण 3 वर्ष कालावधीसाठी नियुक्ती करण्याची तरतूद आहे. त्यात मा. कुलगुरूंच्या अखत्यारीत 2 वर्षे व पुढील एक वर्ष व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेने नियुक्ती करता येते. (सोबत दोन्ही परिनियमाच्या प्रती जोडलेल्या आहेत.<br>c) **विद्यापीठ परिनियम** 2 of 2007 **मधील** मुद्दा क्र. 3 (3) नुसार The Board of Management may make the appointment in subparas (1) and (2) for fixed tenure of not exceeding two years at a time, on such terms and conditions, and on such pay, as may be determined by the Board of Management having regard to his last pay drawn from the earlier employer, if any, his high academic distinction and professional attainments, and specialized knowledge. त्यानुसार नियुक्त्या करता येऊ शकतात. सदर नियुक्ती एका टेन्युअरमध्ये दोन वर्षापर्यंत करण्याची तरतूद असली तरी या परिनियमातील मुद्दा क्र. 5 अन्वये टेन्युअरमध्ये वाढ करून एकूण 6 वर्षापर्यंत नियुक्त्यांची तरतूद आहे. मात्र प्रत्येक दोन वर्षानंतर त्यास मा. व्यवस्थापन मंडळाची मान्यता घेणे आवश्यक आहे.<br><br>4. वरील मुद्यांचा विचार करता गट-अ, गट-ब व गट-क मधील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना करारावर सेवेत घ्यावयाचे असल्यास खालीलप्रमाणे वेतन अदा करता येऊ शकते.<br><br>(A) गट अ - रु. 40,000/- |

| | | |
|---|---|---|
| | | (B) गट ब - रु. 30,000/-<br>(C) गट क - रु. 25,000/-<br>याप्रमाणे सेवानिवृत्त कर्मचारी करारावर नियुक्त करणेबाबतच्या धोरणात्मक निर्णयासाठीचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत मान्यतेस्तव सादर...<br>**<u>व्यवस्थापन मंडळ ठराव</u> - विद्यापीठातील कामांची निकड व अपुरे मनुष्यबळ पाहता गट अ व गट ब याप्रमाणे गट क संवर्गातील कर्मचाऱ्यांना वयाच्या 62 वर्ष पूर्ण होईपर्यंत अध्यादेश/ विद्यापीठ नियमांच्या अधीन राहून वरील मानधनाप्रमाणे करारावर नियुक्ती करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. तसेच एखादा अधिकारी/कर्मचारी यांच्याकडे असलेले विशेष कौशल्य लक्षात घेऊन त्यांचे वेतन ठरविण्याबाबतचे अधिकार मा. कुलगुरू महोदयांना राहतील असे सर्वानुमते ठरले.** |
| | 188.3.9 | **विद्यापीठ कर्मचाऱ्यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेनुसार 12 व 24 वर्षानंतरचे पदोन्नतीचे लाभ लागू करण्याबाबत...**<br>[**टिपणी** – विद्यापीठातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना शासनाची 12 आणि 24 वर्षानंतर मिळणाऱ्या लाभाची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना पदोन्नतीची संधी असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी उच्च व तंत्रशिक्षण विभागाचा शासन निर्णय दि. 28.12.2010 व दि. 15.2.2011 नुसार दि. 1.10.2006 पासून लागू करण्यात आलेली होती.<br>वरील शासन निर्णयास वित्त विभागाची मान्यता नसल्याने सदर योजना पदोन्नतीच्या पदांसाठी 7.12.2018 व एकाकी पदांसाठी 16.2.2019 पासून पूर्वलक्षी प्रभावाने रद्द करण्यात आली. त्यासंदर्भात न्यायालयीन याचिकेच्या निकालाच्या अनुषंगाने उच्च व तंत्रशिक्षण विभागाचा शासन निर्णय क्र. संकीर्ण2016/262/16/विशी-1 दि. 31 मे 2023 अन्वये यापूर्वी रद्द केलेली सुधारित सेवांतर्गत आश्वासित योजना पूर्ववत चालू ठेवल्यामुळे मा. व्यवस्थापन मंडळाने दि. 29 ऑगस्ट 2022 च्या बैठकीतील ठराव क्र. 184.4.2 अन्वये घेतलेला निर्णय अधिक्रमित करून दि. 31 मे 2023 च्या शासननिर्णयानुसार कार्यवाही करण्यासाठीचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत मान्यतेस्तव सादर...<br>**<u>व्यवस्थापन मंडळ ठराव</u> - शासन निर्णय क्र. संकीर्ण2016/262/16/विशी-1 दि. 31 मे 2023 नुसार कार्यवाही करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |
| | 188.3.10 | **विद्यापीठाच्या उत्तरपुस्तिका डीजीटाईज करून ऑनलाईन मूल्यमापनासाठी पुढील पाच वर्षासाठी सेवापुरवठादार निवडीसाठी (End to End Exam Solutions) विहित निविदा प्रक्रिया करण्यासाठीचा प्रस्ताव**<br>[**टिपणी** – विद्यापीठाने Digitalization of Answer books and Online Evaluation या End to End Exam सेवा पुरवठ्यासाठी 2016 मध्ये निविदा प्रक्रिया करून सेवा पुरवठादार नियुक्त केला होता. त्याची मुदत 31 ऑगस्ट 2023 रोजी संपणार आहे.<br>त्यानुसार, विद्यापीठाला पुढील पाच वर्षासाठी End to End Exam Solutions - Question Paper Delivery, Answer book Digitization and Online Evaluation व संबंधित सर्व सेवा पुढील पाच वर्षे पुरवण्यासाठी विहित प्रक्रियेने निविदा प्रक्रिया करणेबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर....<br>**<u>व्यवस्थापन मंडळ ठराव</u> - विद्यापीठाला पुढील पाच वर्षासाठी End to End Exam Solutions - Question Paper Delivery, Answer book Digitization and Online Evaluation व संबंधित सर्व सेवा पुढील पाच वर्षे पुरवण्यासाठी विहित पद्धतीने निविदा प्रक्रिया करण्याची कार्यवाही संबंधित विभागाने करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |
| | 188.3.11 | **विद्यापीठाच्या Online On Screen Evaluation साठीच्या सेवापुरवठादार मे. मॅग्नेटिक ईन्फोटेक, सिकंदराबाद यांचेसमवेत असलेला कराराच्या मुदतवाढीचा प्रस्ताव व्यवस्थापन मंडळाच्या माहितीस्तव.**<br>[**टिपणी** – M/S Magnetic Info Tech Pvt. Ltd., यांचे समवेत विद्यापीठाने Online On Screen Evaluation संदर्भात करार करण्यात आलेला होता. सदर करार तत्कालिन कुलगुरू यांच्या आदेशान्वये 01 मे 2023 पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती, व या करारामध्ये Including May |

| | | |
|---|---|---|
| | | 2023 Event चे काम करावे असे नमुद केलेले होते परंतु सदर May 2023 Exam Event चे कामकाज पुढील 2-3 महिने सुरू राहणार असल्यामुळे सदर करारामध्ये पुन्हा तत्कालीन कुलगुरू यांनी दिनांक 31/08/2023 पर्यंत मुदतवाढीस मान्यता दिलेली आहे.<br>परीक्षेचे कामकाज विस्कळीत होऊ नये, संपुर्ण परीक्षा, निकाल, पुर्नमुल्यांकन इत्यादी वेळेत पूर्ण व्हावे यासाठी तसेच मूळ मुदतवाढीनुसार याच सेवापुरवठादाराने मे 2023 Event चे काम पूर्ण करणे आवश्यक असल्याने सदर करारास दि. 31.8.2023 पावेतो मुदतवाढ देणे आवश्यक आहे, त्यानुसार मा. कुलगुरूंनी मे. मॅग्नेटीक इन्फोटेक यांचे मुदतवाढ मागणी विनंती पत्र दिनांक 28/02/2022 नुसार मान्यता दिलेली आहे.तरी सदर कराराची मुदत संपल्यानंतर दिलेली मुदतवाढीचा प्रस्ताव व्यवस्थापन मंडळाच्या माहितीस्तव व मान्यतेस्तव सादर....<br>**<u>व्यवस्थापन मंडळ ठराव -</u> M/S Magnetic Info Tech Pvt. Ltd. व विद्यापीठ यांच्यात Online On Screen Evaluation संदर्भात झालेला करार दि. 01 मे 2023 रोजी संपुष्टात आला होता. तात्कालिन कुलगुरू यांनी परीक्षेचे कामकाज विस्कळीत होऊ नये, संपुर्ण परीक्षा, निकाल, पुर्नमुल्यांकन इत्यादी वेळेत पूर्ण व्हावे यासाठी कराराच्या कालावधीस दि. 31.8.2023 पर्यंत दिलेल्या मुदतवाढीस सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |
| | 188.3.12 | आरोग्य विज्ञान विद्याशाखेच्या **B.Sc. MLT/DMLT** या शिक्षणक्रमांच्या एकूण 20 विद्यार्थ्यांनी व्यावसायिक नोंदणी करण्यासाठी अर्ज केला असता ती कागदपत्रे विद्यापीठाकडे पडताळणी करिता पाठविण्यात आली होती. त्याची सखोल पडताळणी केली असता ती बनावट व खोटी आढळून आली. त्याचे न्यायालयीन कार्यवाहीसाठी विधी सल्लागार शुल्क अदा करणेबाबत ....<br>[**टिपणी** : आरोग्य विज्ञान विद्याशाखेच्या B.Sc. MLT/DMLT या शिक्षणक्रमांच्या एकूण 20 विद्यार्थ्यांनी परावैद्यक परिषद, मुंबई यांच्याकडे व्यावसायिक नोंदणी करण्यासाठी अर्ज केला असता ती कागदपत्रे विद्यापीठाकडे पडताळणी करिता पाठविण्यात आली होती. त्याची सखोल पडताळणी केली असता ती बनावट व खोटी आढळून आली. याबाबत मा. कुलगुरूंच्या दिनांक 30-07-2022च्या मान्यतेन्वये नेमलेल्या पडताळणी समितीच्या दिनांक 30-12-2022 च्या शिफारशीनुसार त्यांना विद्यापीठ वकीलाकडून कायदेशीर नोटीस पाठवून माहिती मागवावी असा निर्णय झाला. (सोबत संलग्न). परीक्षा नियंत्रक यांची विधी सल्लागार सुनीता लाड यांचेसोबत झालेल्या चर्चेनुसार प्रति विद्यार्थी रू 2500/- इतके शुल्क ठरविण्यात आले. त्यानुसार विद्यापीठाच्या वतीने सदर विद्यार्थ्यांना कायदेशीर नोटीसा विद्यापीठाच्या विधी सल्लागार श्रीमती सुनिता लाड यांच्यामार्फत पाठविण्यात आल्या. त्यासाठी त्यांनी रू. 50,000/- (प्रति विद्यार्थी रू. 2,500/- याप्रमाणे) इतके शुल्क आकारले आहे. तरी वरील कार्यवाहीस व झालेला खर्च मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर...<br>**<u>व्यवस्थापन मंडळ ठराव</u> - आरोग्य विज्ञान विद्याशाखेच्या B.Sc. MLT/DMLT या शिक्षणक्रमांच्या २० विद्यार्थ्यांचे गुणपत्रक व प्रमाणपत्र बनावट व खोटे आढळून आले. त्या विद्यार्थ्यांना कायदेशीर नोटीस देणेकरिता विधी सल्लागार यांना प्रति विद्यार्थी रु. 2500/- प्रमाणे रु. 50000/- इतक्या झालेल्या खर्चास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |
| | 188.3.13 | **विद्यापीठ परिसरातील यशइन, गोदावरी व अभ्यागत अतिथीगृह व सभागृह/क्रिडांगण सुधारित शुल्कास मान्यता मिळणेबाबत व्यवस्थापन मंडळासमोर सादर...**<br>[**टिपणी** - विद्यापीठ परिसरातील यशइन, अभ्यागत व गोदावरी अशी तीन अतिथीगृह व यशइन इमारत, शैक्षणीक इमारत, के. व्ही. के. इमारत येथे सभागृह कार्यरत आहे. त्यांच्या व्यवस्थेबाबत मार्गदर्शक सूचना यापूर्वी तयार केल्या आहेत, तसेच त्यांचे शुल्क दर यापूर्वी मा. कुलगुरु तसेच विद्यापीठ मा. व्यवस्थापन मंडळ यांचे मान्यतेने २०१९ मध्ये निश्चित करुन मान्य केले आहेत. (सोबत ठराव जोडला आहे.<br>या शुल्क दरांस ०४ वर्षांचा कालावधी लोटला असून दैनंदिन देखभालीचा खर्च विचारात घेता या दरांत वाढ करणे गरजेचे आहे. सदर शुल्कांत सोबत जोडल्याप्रमाणे सुधारीत दरवाढ करणे प्रस्तावित आहे. सदर सुधारित दर मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर...<br>**<u>व्यवस्थापन मंडळ ठराव</u> - विद्यापीठ परिसरातील यशइन, गोदावरी व अभ्यागत अतिथीगृह व सभागृह/क्रिडांगण यांच्या खालीलप्रमाणे सुधारित शुल्कास (दरास) व्यवस्थापन मंडळाने सर्वानुमते मान्यता देण्यात आली. तसेच एखाद्या शासकीय/खाजगी संस्थेस खालील प्रमाणे निश्चित केलेल्या शुल्कामध्ये सुट देण्याचे अधिकार मा. कुलगुरू महोदयांना देण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.** |

| अ.क्र | कोणासाठी | प्रती व्यक्ती | अभ्यागत निवास-स्थान पुर्वीचे दर | **अभ्यागत निवासस्थान सुधारीत (प्रस्तावित) दर** | गोदावरी निवास-स्थान पुर्वीचे दर | **गोदावरी निवास्थान सुधारीत (प्रस्तावित) दर** | यशइन निवास पुर्वीचे दर | **यशइन निवास सुधारीत (प्रस्तावित) दर** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | विद्यापीठातील विविध विभाग केंद्र/ कक्ष/ विद्याशाखा यांनी आयोजीत केलेल्या **सभा, बैठका, कार्यशाळा, चर्चासत्र** यासाठी आमंत्रीत केलेले अभ्यागत (मा. कुलगुरु / मा. कुलसचिव यांचे मान्यतेने) | प्रती दिन | निशुल्क | **निशुल्क** | निशुल्क | **निशुल्क** | निशुल्क | **निशुल्क** |
| २. | विद्यापीठात **शैक्षणिक** कामासाठी येणारे विद्यार्थी, व्यक्ती व संस्था, विद्यापीठ कर्मचारी, परीक्षकांकरीता | प्रती दिन | ५०/- | NonAc -**१००/-** Ac- **१५०/-** | ३०/- | **५०/-** | ३००/- | **५००/-** |
| ३. | विद्यापीठात बाहेरुन इतर **खाजगी** कामासाठी येणारे व्यक्ती व संस्था | प्रती दिन | १५०/- | NonAc- **४००/** Ac - **१०००/-** | १००/- | **१५०/-** | ७५०/- | **१५००/-** |
| ४. | **शासकीय/निमशासकीय/सेवाभावी संस्था** आयोजीत बैठक/चर्चासत्र/कार्यशाळा इ. | प्रती दिन | १००/- | NonAc-**५००/-** Ac - **१०००/-** | ५०/- | **२००/-** | ५००/- | **१०००/-** |
| ५. | (फ्रेश होणे) देखभाल खर्च सर्वांकरीता | प्रती दिन | निशुल्क | **१००/-** | निशुल्क | **१००/-** | निशुल्क | **१००/-** |
| ६. | सामान्य नागरिक | प्रती दिन | --- | --- | --- | ------ | ---- | **२०००/-** |

| अ. क्र | **सभागृह / क्रिडांगण** | | पुर्वीचे दर | **सुधारीत (प्रस्तावित) दर** |
|---|---|---|---|---|
| ७. | यशइन इमारत | प्रती दिन | १५०००/- | १८०००/- अधिक GST इलेक्ट्रीक आणि इतर शुल्क (१२ तासांकरीता) |
| ८. | शैक्षणीक इमारत | प्रती दिन | १००००/- | १२०००/- अधिक GST इलेक्ट्रीक आणि इतर शुल्क (१२ तासांकरीता) |
| ९. | के. व्ही. के. इमारत | प्रती दिन | ५०००/- | ५०००/- अधिक GST |
| १०. | मैदान (क्रिडांगण) | प्रती दिन | १२०००/- | १५०००/- अधिक GST इलेक्ट्रीक आणि इतर शुल्क (१२ तासांकरीता) |
| ११. | परिसर पहाणी / शैक्षणीक सहल | प्रती दिन | ५००/- | ५००/- अधिक GST |

188.3.14

**'ॲल्युमनी असोसिएशन ऑफ यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ' संस्थेच्या योगदानात विद्यापीठ प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचेही योगदान असावे म्हणून शैक्षणिक वर्ष 2023-24 पासून प्रमाणपत्र, पदविका, पदवी अथवा पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रमाच्या अंतिम वर्षासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकडून Alumni contribution Fee म्हणून प्रति विद्यार्थी १०/- शुल्क (अक्षरी रूपये दहा) प्रवेश अर्जासोबत आकारण्यात यावेत. सदर रक्कम 'ॲल्युमनी असोसिएशन ऑफ यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ' च्या बँक खात्यात वर्ग करण्याचा ठराव कार्यकारी मंडळात मंजूर करण्यात आला असून सदर विषय व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत मान्यतेस्तव सादर....**

**टिपणी** - यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात अलीकडेच 'अल्युमनी असोसिएशन ऑफ यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ' या संस्थेची स्थापना करण्यात आलेली आहे. सदर संस्था मा. धर्मादाय आयुक्त, नाशिक यांच्या कार्यालयामार्फत नोंदणीकृत करण्यात आली आहे. यापूर्वी दि. ३०/०४/२०२२ रोजी झालेल्या व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत प्रवेश घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांकडून प्रवेश घेतेवेळी Student Alumni Fee म्हणून दोन रुपये (२/-) घेण्यास मान्यता देण्यात आलेली होती. (सोबत व्यवस्थापन मंडळ ठराव क्र. १८२.३.३ जोडला आहे)

'अल्युमनी असोसिएशन ऑफ यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ' च्या वतीने विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. त्याअनुषंगाने संस्थेच्या कार्यकारी मंडळाने नुकतीच सभा घेवून शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून प्रमाणपत्र, पदविका, पदवी अथवा पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रमाच्या अंतिम वर्षासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकडून Alumni contribution Fee म्हणून प्रति विद्यार्थी १०/- शुल्क (अक्षरी रुपये दहा) 'प्रवेश फी' सोबत आकारणेबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर...

**<u>व्यवस्थापन मंडळ ठराव</u> - शैक्षणिक वर्ष 2023-24 पासून प्रमाणपत्र, पदविका, पदवी अथवा पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रमाच्या अंतिम वर्षासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकडून Alumni contribution Fee म्हणून प्रति विद्यार्थी 10/- शुल्क (अक्षरी रूपये दहा) 'प्रवेश फी' सोबत आकारण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

| | | |
|---|---|---|
| | 188.3.15 | दि. 10 जून 2023 रोजी झालेल्या नियोजन मंडळ बैठकीतील ठराव क्र. 44.3.1, 44.3.2, 44.3.3, 44.3.4, 44.3.5, 44.3.6 **व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर...**<br><br>**<u>व्यवस्थापन मंडळ ठराव</u> - नियोजन मंडळ बैठकीतील ठराव क्र.**<br>**44.3.1** - प्रा. राम ताकवले रिसर्च अँड डेव्हलपमेंट केंद्र (RT-RDC" हे केंद्र स्थापन करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>**44.3.2** - शासनाच्या स्टार्टअप योजनेत सहभागी होता यावे आणि विद्यार्थी व समाजातील इतर घटकांच्या संशोधन कल्पनांना मूर्त स्वरूप देऊन त्यांना स्टार्टअप मध्ये संधी उपलब्ध करून देण्याकरिता Yash Centre for Innovation, & Incubation and Linkages (YCIIL) हे केंद्र स्थापन करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>44.3.3 - राष्ट्रीय शैक्षणिक धोरण – 2020 आणि विद्यापीठ अनुदान आयोग यांनी वेळोवेळी विद्यापीठाच्या सर्वांगीण विकासासाठी समाजातील तज्ञ लोकांचा अनुभव व कुशलतेचा फायदा करून घेण्यासाठी Research, Patent and IPR , Agro Tourism and Extension, Online Learning, Innovation, Incubation and Start up या क्षेत्रातील प्रत्येकी एक प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिस सारख्या पदांची निर्मिती करण्याची तसेच या पदांचे मानधन निश्चित करण्याचे अधिकार मा. कुलगुरू यांना देण्यास सर्वानुमते मान्यता देणयात आली.<br>44.3.4 - शैक्षणिक वर्ष 2023-24 पासून सर्व विद्याशाखांनी सुधारित शिक्षणक्रम शुल्क वाढ करण्यास मान्यता देणे, त्यावर नविन शैक्षणिक धोरण व त्याअनुषंगाने विद्यार्थ्यांना विविध योजना उपलब्ध करून देणे तसेच अध्ययन साहित्य निर्मीती करावी लागणार असल्याने विद्यापीठास आर्थिक भार सहन कारावा लागणार असल्याने तसचे या संदर्भात वित्त समितीने ठराव क्र. 13 अन्वये केलेली शिफारस तसेच यासंदर्भात वेळोवेळी निर्णय घेण्याचे अधिकार मा. कुलगुरू यांना देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>**44.3.5** - शैक्षणिक संयोजक पदनामात बदल करून ते सहाय्यक प्राध्यापक ( करारावर)Assistant Professor ( on contract basis) असे करणे आणि सहायक प्राध्यापक पदाचा बेसीक पे (7 व्या वेतन आयोगानुसार) देण्यास व निवड करतांना युजीसीच्या नियमांचा व विद्यापीठ अध्यादेश व परिनियमांचा आधार घेऊन करार पद्धतीने नेमणूक करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>**44.3.6** – i. विद्यापीठातील विद्याशाखा/विभाग व केंद्र यातील संचालक पदांसाठी रोटेशन पद्धत पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्यास<br>ii. विद्यापीठातील विद्याशाखा/विभाग व केंद्रातील संचालक पद दर तीन वर्षानी त्याच विभागातील पात्र प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक यांच्यामध्ये त्यांच्या सेवाजेष्ठतेनुसार आळीपाळीने बदलण्यास,<br>**iii.** सहयोगी प्राध्यापकाकडे संचालक पद प्रभारी संचालक म्हणून न देता नियमित संचालक म्हणून देण्यात यावे.<br>**iv.** तसेच संचालक पदाकरिता अस्तित्वात असलेल्या परिनियमामध्ये योग्य तो बदल वरील बाबींच्या अनुषंगाने करण्यात यावा अशी सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 188.3.16 | दि. 19 जून 2023 रोजी होणाऱ्या विद्वत परिषद – 61 चे इतिवृत्त व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर...<br>**<u>व्यवस्थापन मंडळ ठराव</u> - दि. १९ जून २०२३ रोजी होणाऱ्या विद्वत परिषद – ६१ चे इतिवृत्तास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. यातील**<br>६१.४.६ - राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, ऑनलाईन शिक्षण आणि भविष्यात मुक्त विद्यापीठाला अनेक आव्हानांना सामोरे जावे लागणार आहे. विद्यापीठास विद्यार्थी संख्या वाढीसाठी अनेक आमूलाग्र बदल करावी लागतील आणि त्यासाठी वेळोवेळी धोरणात्मक निर्णय घ्यावे लागतील. धोरणात्मक निर्णय विद्यार्थ्यांपर्यंत पोहचण्यासाठी काही नवीन विद्याशाखा/ केंद्र किंवा विभाग स्थापन करावे लागतील. आवश्यकतेनुसार विद्याशाखा/केंद्र किंवा विभाग स्थापन करण्याचे अधिकार मा. कुलगुरूंना दिल्यास निर्णय घेतांना विलंब होणार नाही अशी धारणा आहे. त्याकरिता विद्यापीठाच्या गरजेनुसार नवीन विद्याशाखा, केंद्र व विभाग स्थापन करण्याबाबत सर्व अधिकार मा. कुलगुरू यांना देण्याबाबत विद्वत परिषदेने केलेल्या शिफारशीस सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | 188.3.17 | दि. 19 जून 2023 रोजी होणाऱ्या वित्त समिती 6/2023-24 चे इतिवृत्त व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर...<br>**<u>व्यवस्थापन मंडळ ठराव</u>** - दि. 19 जून 2023 रोजी झालेल्या वित्त समिती 6/2023-24 च्या इतिवृत्तास खालील क्र. 1 च्या बदलासह सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>**1. वित्त समितीतील ठराव क्र. 4 नुसार श्री. भूपेश गुल्हाने यांना दंडापोटी आकारलेली रक्कम रु. 1,61,867/- पैकी रु. 1,00,000/- माफ करून त्यांना रु. 61,867/- वसूल करणेबाबत शिफारस केली होती. सदर शिफारस व्यवस्थापन मंडळासमोर पुनरावलोकनासाठी ठेवली असता सदर शिफारस नामंजूर करण्यात आली, आणि श्री. भूपेश गुल्हाणे यांनी रु. 1,61,867/- इतकी रक्कम विद्यापीठात भरल्यानंतर त्यांना ना हरकत प्रमाणपत्र देण्यात यैईल असे सर्वानुमते ठरले.**<br>**2. मा. वित्त अधिकारी यांनी विद्यापीठाचे आयकर विभागाकडे असलेले 58 कोटींचे प्रलंबित अपील यशस्वी रित्या निकाली काढले. तसेच विदयापीठाने यापूर्वी भरलेला आयकर रू. 20 कोटी व त्यावर 6 कोटींचे व्याज असे एकूण 26 कोटी परत मिळण्याची मागणी मा. वित्त अधिकारी डॉ. गोविंद कतलाकुटे यांनी केली आहे. सदर मागणी आयकर विभागाने मान्य केली असून ती लवकर विद्यापीठास प्राप्त होईल. मा. वित्त अधिकारी यांनी केलेल्या अथक प्रयत्नाबद्दल त्यांच्या अभिनंदनाचा ठराव पारित करण्यात आला.** |
| 188.4.0 | | **मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळचे विषय** |
| | 188.4.1 | **विद्यापीठ सेवेतून सेवानिवृत्त झालेले शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी व कर्मचारी यांना विद्यापीठाच्या विविध शिक्षणक्रमाच्या प्रवेश शुल्कात सवलत मिळणेबाबत....**<br>**[टिपणी** — व्यवस्थापन मंडळ ठराव क्र. ए-100/99/120 दि. 27.08.1999 च्या ठरावान्वये विद्यापीठ कर्मचारी आणि त्यांचे कुटुंबिय यांना विद्यापीठ धोरणानुसार विद्यापीठ कर्मचारी व त्यांचेवर अवलंबून असलेली मुले/मुली (तीन पेक्षा जास्त नाही) यांनी विद्यापीठाच्या शिक्षणक्रमास प्रवेश घेतल्यास शिक्षणक्रम शुल्कातील विद्यापीठ हिस्स्यात 50% सवलत लागू आहे. दि. 24.5.2023 च्या मा. कुलगुरू यांचे समवेत झालेल्या बैठकीत विद्यापीठातून जे शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी व कर्मचारी सेवानिवृत्त होतील त्यांना सेवा निवृत्तीनंतर विद्यापीठामार्फत राबविल्या जाणाऱ्या शिक्षणक्रमांना प्रवेश घ्यावयाचा असल्यास त्यांना शिक्षणक्रम शुल्कातील विद्यापीठ हिस्स्यात 50% सवलत लागू करणेबाबतचा विषय व्यवस्थापन मंडळासमोर विचारार्थ सादर....]<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - विद्यापीठातून जे शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी व कर्मचारी सेवानिवृत्त होतील त्यांना सेवा निवृत्तीनंतर विद्यापीठामार्फत राबविल्या जाणाऱ्या शिक्षणक्रमांना प्रवेश घ्यावयाचा असल्यास त्यांना शिक्षणक्रम शुल्कातील विद्यापीठ हिस्स्यात 50% सवलत लागू करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 188.4.2 | **सर्व शिक्षणक्रमांचे होम असाईनमेंट (Continues Assessment) ऑनलाईन पध्दतीने राबविणेसाठी विहीत प्रक्रिया करणेबाबत..**<br>**[टिपणी** - सर्व शिक्षणक्रमाच्या Home Assignment (Continues Assessment) च्या Component हा विद्यार्थ्याने स्वाध्याय ऑनलाईन सादर करावा, अभ्यासकेंद्राने त्यांच्या कडील परीक्षकाला ऑनलाईन Allot करावा, परीक्षकाने ऑनलाईन तपासून गुणदान द्यावे व विद्यापीठ परीक्षा विभागाला उपलब्ध गुण होतील, याप्रकारची प्रणाली विकसीत करुन घेणे व यासंबंधीची सर्व प्रक्रीया करावी यासाठी End to End Solution- Service Provider पाच वर्ष नियुक्तीसाठी निविदा प्रक्रीया करुन पुढील कार्यवाही करणेसाठी दि. 19 जून 2023 रोजी झालेल्या परीक्षा मंडळाच्या बैठकीत एकमताने केलेली शिफारस व्यवस्थापन मंडळासमोर विचारार्थ सादर....]<br>**<u>व्यवस्थापन मंडळ ठराव</u> — विद्यापीठाला पुढील पाच वर्षासाठी End to End Exam Solutions - Home Assignment (Continues Assessment) संबंधित सर्व सेवा पुढील पाच वर्षे पुरवण्यासाठी विहित पद्धतीने निविदा प्रक्रिया करण्याची कार्यवाही संबंधित विभागाने करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |

| | | |
|---|---|---|
| | 188.4.3 | **Board of Innovation, Incubation, Enterprise and Linkages तयार करणेबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन मंडळासमोर सादर...**<br>[**टिपणी** – विद्यापीठ नजीकच्या काळात Innovation, Incubation, Enterprise and Linkages सदर्भात कार्य करणार आहे. यासाठी वेळोवेळी याबाबत योग्य ते मार्गदर्शन आणि निर्णय घेण्यासाठी Board of Innovation, Incubation, Enterprise and Linkages स्थापन करण्यासाठी तसेच या बोर्डात नेमण्यात येणाऱ्या सदस्यांची संख्या आणि नामनिर्देशन करण्याचे सर्व अधिकार देणेसंदर्भात प्रसातव चर्चा व व्यवस्थापन मंडळासमोर विचारार्थ सादर....<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव – Board of Innovation, Incubation, Enterprise and Linkages स्थापन करण्यास व सदस्य संख्या व नामनिर्देशन करण्याचे सर्व अधिकार कुलगुरूंना देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |
| | 188.4.4 | **विद्यापीठातील कामात सुसूत्रीकरण तसेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या (NEP2020) अनुषंगाने येण्याऱ्या कामांसाठी Officer on Special Duty (OSD), Law Officer आणि Security Officer ही पदे नियुक्तीबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन मंडळासमोर सादर...**<br>**टिपणी –**<br>1. विद्यापीठाचे अध्यादेश व परिनियमांमध्ये नव्याने दुरूस्ती करून अद्ययावत करणे, e-GOVERNANCE व MOU या संदर्भातील कामे करण्याकरिता OSD ची नेमणूक करण्याची आवश्यकता आहे.<br>2. विद्यापीठास वेळोवेळी कायदेशीर सल्ला देणे, विविध प्रकारच्या कोर्ट केसेस हाताळणे, कायदेशीर नोटीसा पाठविणे, विद्यापीठाच्या आवश्यक असणाऱ्या MOU ची तपासणी करणे व बौधिक मालमत्ता अधिकार (Intellectual Property Rights) या संदर्भातील कामकाजासाठी कायदा अधिकारी (Law Officer) यांची नेमणुक करणे आवश्यक आहे.<br>3. विद्यापीठाचा परिसर 150 एकर असून त्याचे संरक्षण करण्यासाठी सुरक्षारक्षकांची कंत्राटी पद्धतीने नेमणूक बाह्य एजन्सीकडून करण्यात येते. त्यावर देखरेख करण्यासाठी विद्यापीठाकडून सक्षम सुरक्षा अधिकारी असणे आवश्यक आहे.<br>वरील तीनही पदे विद्यापीठाच्या कामाच्या दृष्टीने आवश्यक असल्याने सदर पदांची नियुक्ती करण्याचा प्रस्ताव व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव - Officer on Special Duty (OSD), Law Officer आणि Security Officer (प्राधान्याने सेवा निवृत्त अधिकारी, उद्योग, विविध संस्थांमधून) ही पदे भरण्यास मान्यता देण्यात आली व सदर पदांची शैक्षणिक अहर्ता, अनुभव व मानधन ठरविण्याचे अधिकार मा. कुलगुरूंना देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |
| | 188.4.5 | **विद्यापीठ फाटा ते विद्यापीठ हा 2 किलोमिटरचा रस्ता तात्पुरत्या स्वरूपात दुरूस्त करणे तसेच त्यासाठी रु. 3,50,000/- इतक्या खर्चास मान्यता मिळण्याचा प्रस्ताव व्यवस्थापन मंडळासमोर सादर...**<br>**टिपणी** – विद्यापीठ फाटा ते विद्यापीठ रस्त्याचा वापर विद्यापीठाचे विद्यार्थी, अभ्यागत, विविध मान्यवर, कर्मचारी वृंद व आजूबाजूचे रहिवासी करत असतात. सततच्या वापरामुळे या रस्त्यावर मोठ्याप्रमाणात खड्डे पडून हा रस्ता खराब झालेला आहे. सदर रस्ता जिल्हा परिषद नाशिक यांच्या मालकीचा असून दुरूस्तीसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग नाशिक यांचेकडे मंजूर झालेला आहे. सदर रस्त्याची निविदा प्रक्रिया प्रगती पथावर आहे. परंतू प्रत्यक्ष काम सुरू होण्यास मोठा कालावधी लागण्याची शक्यता आहे व पावसाळा सुरू होत असल्याने तातडीने रस्त्याची दुरूस्ती होणे आवश्यक आहे. तरी सदरील रस्त्याची तात्पुरत्या स्वरूपात पावसाळ्यापूर्वी दुरूस्ती करणे आवश्यक आहे. या दुरूस्तीस तीन लाख पन्नास हजार इतका खर्च येणार असल्याचे सार्वजनिक बांधकाम विभाग नाशिक यांनी अंदाजपत्रक दिले आहे. सदरचा निधी विद्यापीठाने सार्वजनिक बांधकाम विभाग नाशिक यांचेकडे वर्ग करण्याचा विषय व्यवस्थापन मंडळासमोर निर्णयार्थ सादर...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव – विद्यापीठ फाटा ते विद्यापीठ हा 2 किलोमिटरचा रस्ता तात्पुरत्या स्वरूपात दुरूस्त करण्यासाठी येणाऱ्या रु. 3,50,000/- इतक्या खर्चास तसेच सदरचा निधी सार्वजनिक बांधकाम विभाग नाशिक यांचेकडे वर्ग करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |

| | | |
|---|---|---|
| | 188.4.6 | **विभागीय केंद्रावरील वरिष्ठ सल्लागार म्हणून करारावरील नियुक्त करतांना अदा करावयाच्या वेतनाबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन मंडळासमोर सादर...**<br>[टिपणी - विभागीय केंद्रावरील वरिष्ठ सल्लागार हे पद सेवानिवृत्त झालेल्या प्राध्यापक, प्राचार्य आणि शैक्षणिक क्षेत्रातील अनुभवी व्यक्ती अशा शिक्षक संवर्गातून भरले जाते. त्यांना शासनाकडून निवृत्ती वेतन मिळत असते. त्यामुळे मा. व्यवस्थापन मंडळ सभा दि. 29.11.2014 रोजी झालेल्या ठराव क्र. 146.4.14 अन्वये दिले जाणारे रु. 70,000/- वेतन कमी करून दरमहा रु. 50,000/- + अलाऊन्स पोटी रु. 10,000/- ( दरमहा प्रवास, दूरध्वनी सेवेपोटी भत्ता) अशा प्रकारे एकत्रित वेतन करण्याचा प्रस्ताव व्यवस्थापन मंडळासमोर निर्णयार्थ सादर...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव - विभागीय केंद्रावरील वरिष्ठ सल्लागार यांना दरमहा रु. 50,000/- + अलाऊन्स पोटी रु. 10,000/- ( दरमहा प्रवास, दूरध्वनी सेवेपोटी भत्ता) अशा प्रकारे एकत्रित वेतन देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |

मा.कुलगुरू तथा अध्यक्ष व्यवस्थापन मंडळ यांच्या परवानगीने बैठक संपन्न झाल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

**कुलसचिव तथा सचिव**
**व्यवस्थापन मंडळ**

**अध्यक्ष**
**व्यवस्थापन मंडळ**